# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**

**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/ ५६७५ /२०२३** **पुणे दिनांक - ०५/०८/२०२३**

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, सिंहगड रोड वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी पार्किंगचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**सिंहगड रोड वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

१. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडे जाताना गोयलगंगा चौक ते आय.सी.आय.सी.आय. बँकेपर्यंत (दुभाजक संपेपर्यंत) रोडचे दोन्ही बाजूला ५० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन तयार करण्यात येत आहे.**
२. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडे जाताना गोयलगंगा चौक ते आय.सी.आय.सी.आय. बँके ते अमृतगंगा सोसायटी गेट नं. ४ (शोरबा हॉटेल) पर्यंत रोडचे डाव्या बाजुला फक्त दुचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था करण्यात येत आहे.**
३. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय चौकाकडे जाताना रोडच्या उजव्या बाजूस दुभाजक संपलेनंतर मनपा प्रस्तावित नाटयगृह ते अतिथी हॉटेल पर्यंत फक्त चारचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था करण्यात येत आहे.**
४. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय चौकाकडे जाताना रोडच्या उजव्या बाजूस एच.डी.एफ.सी. बँकेपासून ते सोबा ऑप्टिमा सोसायटीचे गेट (प्रेमाचा चहा शॉप) पर्यंत फक्त दुचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था करण्यात येत आहे.**
५. **सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडून गोयलगंगा चौकाकडे जाताना सिंहगड क्षेत्रिय कार्यालय चौक ते दुभाजक संपेपर्यंत रोडचे दोन्ही बाजूस १०० मीटर पर्यंत नो पार्कींग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – ०६/०८/२०२३ ते दिनांक – २०/०८/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

**जा.क्र./पोउआ/वाह/ ५६७२ /२०२३** **पुणे दिनांक - ०५/०८/२०२३**

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, सिंहगड रोड वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी वाहतूकीचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**सिंहगड रोड वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**१. स्वारगेटकडुन वडगाव पुल वीर बाजी पासलकर चौकाकडे येणारी वाहतूक सिंहगड रोडने गणेशमळा सिग्नल येथे डावीकडे वळून जनता वसाहत कॅनॉल रोडने कै. मिसाळ उद्याण (कॅनॉल जंक्शन) येथे डावीकडे वळवून कॅनॉलच्या उजव्या बाजूने आनंदविहार रोडने तूकाईनगर चौकापर्यंत एकेरी करण्यात येत आहे.**

**२. वडगाव पुल (वीर बाजी पासलकर) चौकाकडुन स्वारगेट कडे जाणारी वाहतूक सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय चौकातून डावीकडे वळुन लंडन पुल चौक ते कै. मिसाळ उद्यान (कॅनॉल जंक्शन) चौकातून डावीकडे वळून विश्रांतीनगर चौकापर्यंत एकेरी वाहतूक करण्यात येत आहे.**

**३. कै मिसाळ उद्यान (कॅनॉल जंक्शन) कडुन येणारी वाहने (कॅनॉलच्या डाव्या बाजूने) जाण्यास बंदी करण्यात येत आहे.**

**४. दोन्ही कॅनॉल रोड जोडणारा लंडन पुलावरून हिंगणे ते महादेवनगर कडे जाण्याकरीता चारचाकी वाहनांना बंदी करण्यात येत असुन फक्त दुचाकी वाहनांना प्रवेश देण्यात येत आहे.**

**५. जनता वसाहत ते सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय फन टाईम थिएटर पर्यंत कॅनॉल रोडवर जड वाहतूकीस बंदी करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग :- स्वारगेटकडुन वडगाव पुलाकडे (वीर बाजी पासलकर चौक) येण्याकरीता व वडगाव पुलाकडुन स्वारगेट कडे जाणेकरीता (कॅनॉल रोड) पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याने वाहन चालकांची / नागरिकांची गैरसोय होणार नाही.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक- ०६/०८/२०२३ ते दिनांक २०/०८/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.